

# अथ श्री औदुंबराष्टक स्तोत्रम्

## श्री गणेशाय नमः ।।
## श्री दत्तात्रेयाय नमः ।।
## श्री स्वामी समर्थाय नमः ।।

निर्मल छाया कृपार्थ दायी तर्पणकारी मन:शांतकारी च ।
मनमोहकारी सूक्ष्मान्तकारी औदुंबराय नमो नम: ।।
जलधारी उदकस्रावकारी निरावती अम्बुजा च।
खगेन्द्र प्रियजा प्रेमवाही प्रेमगंगाधारी।औदुंबराय नमो नमस्ते ।।
गंगाधारी दत्तानंददायी गोरक्षकारी संजीवनी कर्ता च
इंद्रियानां मोहयति प्रसन्न करता । औदुंबराय नमो नमस्ते ।।
कल्पवृक्ष मनोबल प्रफुल्लयति ईप्सित कामना सिद्धकारी च।
आल्हाददायी संरक्षणकारी त्रैमूर्ति पालि। औदुंबराय नमो नमस्ते ।।
त्रिगुणी त्रैलोक्य मंगलदायी मंगलकारी सत्यदायि च ।
सात्विक ऋणनाशी पापदाही मोक्षदायी । औदुंबराय नमो नमस्ते ।।
ब्रम्हाविष्णू महेश धारी सत्य प्रकाशी ज्योतिष मति च ।
तत् सानिध्ये प्रज्ञावंत निवासे । कृपाछत्रधारी । औदुंबराय नमो नमस्ते ।।
कृपालया कृपावंता कृपाछाया कृपाकर्ता सन्मार्गदर्शी च ।
ज्ञापक ज्ञानवंत प्रज्ञावंतधारी सुलक्षणी च । औदुंबराय नमो नमस्ते ।।
गुरूदर्शी सुखी परमात्मदर्शी त्रिलोकदर्शी सम्नार्गी च ।
त्रिगुणधारी छत्रधारी आत्मबोधी । औदुंबराय नमो नमस्ते ।।
यं इदम् अष्टकस्तोत्रम् औदुम्बर सानिध्ये पठेन्नर: ।
स गुरुदिक्षाम् गुरुछायाम् तथा दत्तकृपाम् च लभते ।
श्री औदुम्बराऽर्पणमस्तु ।।
शुभं भवतु ।। शुभं भवतु ।। शुभं भवतु ।।

उंबराचे झाड हे कल्पवृक्ष आहे. त्याच्याजवळ त्रिगुण दत्तात्रयांचा वास असतो. हे अष्टक स्तोत्र उंबराच्या झाड्याच्या सानिध्यात वाचले असता. सतत गुरुछाया राहते. व लवकरच गुरुदिक्षा मिळून आशीर्वाद प्राप्त होतो. शहरी वातावरणात उंबराचे झाड नसेल तर मानस रुपाने उंबराच्या झाडाचे ध्यान करुन हे स्तोत्र रोज वाचावे. रक्षण दृष्टीने हे कवच उत्तम आहे. कोणत्याही गोष्टीच्या रक्षणासाठी हे स्तोत्र वाचावे.

हे स्तोत्र औदुंबराजवळ वाचल्याने गुरुछाया, गुरुदिक्षा व दत्तकृपा लाभते. तसेच बावन्न श्लोकी गुरुचरित्र वाचून हे स्तोत्र वाचल्याने आत्मदर्शन होते.

ऋणनाशाकरता औदुंबराला २१ प्रदक्षिणा घालून हे स्तोत्र ३ वेळा वाचून असे ७२ दिवस केल्याने फळ निश्चित मिळते. गुरुचरित्र ह्या पोथीचे पारायण औदुंबर सानिध्यात केल्याने भूतबाधांचा नाश होऊन औदुंबराची कृपाछाया सतत राहते. अभिष्टस्थिती तसेच अडचणीच्या कामात यश येण्यासाठी मनात औदुंबर वृक्षास स्मरण करुन हे स्तोत्र पठण केल्याने कार्य सिध्द होते.